## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

इयत्ता १२ वीचा निकाल जाहिर झाल्याने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचे पारंपारिक वरीष्ठ महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रीया सुरू झाली आहे. प्रवेश प्रक्रीयेमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत म्हणून पुढील बाबींची खबरदारी घ्यावी -

१. महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ कलम ६५ नुसार तयार करण्यात आलेल्या व जा.क्र.संलग्नता/टी-२/१६२/१८१, दि.०३ जून, १९९५ अन्वये सर्व संलग्न कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांना पाठविलेल्या प्रवेश नियमानुसार ज्या संस्थेच्या वरीष्ठ महाविद्यालयाला जोडून त्यांचे कनिष्ठ महाविद्यालयही आहे, अशा वरीष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश देताना संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ८०% प्रवेश राखीव ठेवावे व अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उर्वरीत २०% जागांवर मेरीटनुसार प्रवेश द्यावेत.

२. प्रवेश प्रक्रीया राबविताना राखीव जागांबाबतचे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम पाळणे आवश्यक आहे.

३. प्रवेश देताना विद्यार्थ्यांकडून अॅटी रॅगिंगबाबतचा फॉर्म भरून घेणे आवश्यक आहे.

कळावे,

आदेशान्वये,

उपकुलसचिव

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 71
दि. 8 JUN 2018